SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR-416 004 MAHARASHTRA
PHONE EPABX-2609000,2693643 ☐ FAX : 0091-231-2691533 & 0091-231-2692333
C &U.O. Section - 9144,9492,9145
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर - ४१६ ००४, महाराष्ट्र
दूरध्वनी : (ईपीएबीएक्स) २६०९००० (दहा लाईन्स) फॅक्स-००९१-२३१-२६९१५३३ व ००९१-२३१-२६९२३३३
म.व वि.वि. विभाग - ९१४४,९४९२,९१४५

'A'
NAAC A Grade
MHRD-NIRF-28[th] Rank

Vice-Chancellor Office Fax - 0091-231-2691533
Registrar Office Fax - 0091-231-2692333 C.O.E Office Fax - 0091-231-2693173

क्र. एसयू/सीयूडीएस/ 81 दि. 29 APR 2017

प्रति,

१. मा. प्राचार्य/ संचालक / प्र. प्राचार्य/ प्र. संचालक,
सर्व संलग्नित महाविद्यालये/ मान्यताप्राप्त संस्था

२. अधिविभागप्रमुख/ संचालक / समन्वयक,
सर्व अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**विषय:-राजीव गांधी सायन्स ॲन्ड टेक्नालॉजी कमिशन, मुंबई व शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांच्या दरम्यान सुरु असलेल्या उपक्रमातंर्गत एक दिवसीय कार्यशाळा आयोजनाबाबत.**

महोदय,

उपरोक्त विषयास अनुसरुन आदेशान्वये कळविण्यात येते की, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर व राजीव गांधी सायन्स ॲन्ड टेक्नॉलॉजी कमिशन, मंत्रालय, मुंबई यांचेमध्ये झालेल्या सामंजस्य करारानुसार **"Assistance for S & T Applications through University System"** हा उपक्रम कार्यरत आहे. या उपक्रमातंर्गत महाविद्यालयातील व विद्यापीठ अधिविभागातील शिक्षकांना विज्ञान आणि तंत्रज्ञानावर आधारित व स्थानिक गरजांशी निगडीत संशोधन प्रकल्पास अनुदान (आर्थिक सहाय्य) दिले जाते. परंतु, अनुदान मिळणेसाठी सादर केलेल्या प्रकल्पापैकी बहुतांश प्रकल्प हे आयोगाने ठरविलेल्या विज्ञान-तंत्रज्ञान विषय व दर्जा या संबधी नसतात. तेव्हा त्यासाठी संशोधक शिक्षकांना आयोगाने प्रकल्पासाठी ठरवून दिलेला विषय, गुणवत्त दर्जा, सामाजिक व आर्थिक उपयुक्तता या संबधी तज्ञांकडून मार्गदर्शन करणेसाठी दि. 06/05/2017 रोजी दुपारी 2.30 ते 5.30 या वेळेत राजर्षी शाहू हॉल (सिनेट हॉल), शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर येथे एक दिवसीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली आहे.

तेव्हा वरील आयोजित करण्यात आलेल्या कार्यशाळेस महाविद्यालयातील व विद्यापीठातील शिक्षक यांनी सहभागी व्हावे. यासंदर्भातील सोबत जोडलेले माहितीपत्रक संबधित शिक्षकांच्या निदर्शनास आणून आपल्या महाविद्यालयातील किमान दोन शिक्षकांना कार्यशाळेत सहभागी होणेसाठी पुरस्कृत करावे व सहभागी होणाऱ्या शिक्षकांचे Registration Form दि. 03/05/2017 रोजीपूर्वी srp_chem@unishivaji.ac.in या मेलवर पाठविण्यात यावे.

कळावे,

आपला विश्वासू,

कुलसचिव
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर